सत्यमेव जयते

**राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष**
**राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान**
**(महाराष्ट्र राज्य)**

---

जा.क्र/रा.गां.पं.स.अ./प्रशि/७५५/२०१६ दि. २७ जून, २०१६

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, (सर्व)**

**विषय - जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षक व गणस्तरीय प्रविण प्रशिक्षक यांना द्यावयाचे मानधन व निधी वितरण...**

**संदर्भ** - या कार्यालयाचे पत्र जा.क्र./रा.गां.पं.स.अ./प्रशि/७२६/२०१६, दि. १२ मे, २०१६

'आमचं गाव आमचा विकास' अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा उपक्रमाच्या प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांबाबत मार्गदर्शक सुचना संदर्भिय पत्रान्वये निर्गमित करणेत आलेल्या आहेत.

उपरोक्त नमुद मार्गदर्शक सूचनांमध्ये विविध प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी बाबनिहाय खर्चाचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे. तथापि, काही जिल्ह्यांकडून जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षक व गणस्तरीय प्रविण प्रशिक्षक यांचे मानधनाबाबत विचारणा होत असल्यामुळे याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देणेत येत आहेत.

## जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षक मानधन

| अ.क्र. | उपक्रम | मानधन | मानधन वितरण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तरीय प्रशिक्षण/कार्यशाळा/बैठका | रू. १०००/- प्रति सत्र | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | तीन दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया सनियंत्रण | प्रति ग्रामपंचायत रू. २००/- मानधन व रू. १००/- प्रवासखर्च | गट विकास अधिकारी |

जिल्हास्तरीय प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांमध्ये जिल्हास्तरीय प्रमुख प्रविण प्रशिक्षकांना त्यांनी घेतलेल्या सत्रांसाठी प्रति सत्र रू. १०००/- याप्रमाणे त्या उपक्रमासाठी प्रविण प्रशिक्षकांसाठी मंजूर सत्रांच्या व निधीच्या अधिन मानधन अदा करण्यात यावे.

जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षकांनी ग्रामपंचायत स्तरावरील ३ दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष प्रक्रिया सूरू असताना संबंधीत ग्रामपंचायतीस भेट देऊन सनियंत्रण करावयाचे आहे. गट विकास अधिकारी यांनी संबंधीत जिल्हा प्रविण प्रशिक्षक यांचेकडून सनियंत्रण भेटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मानधन अदा करण्यास हरकत नाही.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी आपल्या जिल्ह्यासाठी उपलब्ध जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षकांची संख्या लक्षात घेता प्रत्येक जिल्हा प्रमुख प्रविण प्रशिक्षकांना सनियंत्रणासाठी पंचायत समिती/गण/ग्रामपंचायत निहाय वाटप करावयाचे आहे.**